मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

# मराठी अर्थशास्त्र परिषद

सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट–१८६० व मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट–१९५०
अन्वये नोंदविलेली नोंदणी क्र.एफ–४६१५ मुंबई







## ४७ वा वार्षिक अहवाल

सन २०२४–२५

## ४७ वे वार्षिक अधिवेशन

३०, ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी २०२५

✻ आयोजक ✻

दयानंद शिक्षण संस्था संचालित,
दयानंद कला महाविद्यालय, लातूर




प्रा.डॉ.विलास खंदारे
अध्यक्ष


प्रा.डॉ.विकास सुकाळे
कार्याध्यक्ष


प्रा.डॉ.मारोती तेगमपुरे
कार्यवाह – खजिनदार


प्रा.डॉ.राहुल म्होपरे
संपादक – अर्थसंवाद


डॉ.जयवंत इंगळे
सदस्य


डॉ.बाळासाहेब पाटील
सदस्य


डॉ.सुभाष सावंत
सदस्य


डॉ.विठ्ठल ठावरी
सदस्य


डॉ.जितेंद्र तलवारे
सदस्य


डॉ.राजाराम पाटील
सदस्य


डॉ.हनुमंत भोसले
सदस्य


डॉ.राजु शिंदे
सदस्य


डॉ.विजय भोपाळे
सदस्य


डॉ.धीरज कदम
सदस्य


डॉ.दिपक भुसारे
सदस्य


डॉ.संभाजी काळे
स्वीकृत सदस्य


डॉ.लक्ष्मण म्हस्के
स्वीकृत सदस्य


डॉ.धनंजय काळे
स्थानिक कार्यवाह


डॉ.विठ्ठल घिनमीने
विश्वस्त


डॉ.धोंडीराम पवार
विश्वस्त


डॉ.गणेश गावंडे
विश्वस्त

# मनोगत

४७ वर्षांची वाटचाल यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या आपल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेला समृद्ध, वैचारिक आणि उज्वल ऐतिहासिक परंपरा आहे. महाराष्ट्र राज्य हे ज्ञानसंपन्न, गुणसंपन्न आणि प्रतिभा संपन्न असे पुरोगामी राज्य असून सामाजिक परिवर्तनाचे बीज असणाऱ्या भक्कम अर्थशास्त्र अभ्यासकांची एक फळी निर्माण करण्याचे अमूल्य असे कार्य मराठी अर्थशास्त्र परिषदेने केले आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य भारतभर असून गुजरात, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगढ़, कर्नाटक आणि गोवा या बरोबरच विदेशातही आहेत. सर्वत्र शिस्तीची, आपल्या निष्ठेची, अभ्यासाची छाप निर्माण करणाऱ्या या संस्थेचा कार्यवाह - खजिनदार असल्याचा मला सार्थ अभिमान वाटतो. याबरोबरच ही संधी केवळ आपल्यामुळेच प्राप्त झाल्याची जाणीवही मला आहे. या दीर्घ काळात परिषदेला आदरणीय प्रा. रविंद्र सबनीस, प्रा. व्य.सु पाटणकर, डॉ. आ.गो पुजारी, डॉ. सर्जेराव ठोंबरे, प्रा. चारूदत्त गोखले, डॉ. अनिल सूर्यवंशी आणि डॉ. राजेंद्र भांडवलकर यांनी कार्यवाह-खजिनदार पदाची धुरा अत्यंत निष्ठापूर्वक शिस्तबद्ध पद्धतीने आणि आर्थिक नियोजनात वाहिली आहे. या सर्वांनी या पदाला एक उज्वल परंपरा व आदर्श संकेत निर्माण करून दिले आहेत. या सर्वांच्या निस्वार्थ कार्याबद्दल मी नितांत आदरभाव प्रकट करतो.

मागे वळून पहाताना ४७ वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीत परिषदेला नावलौकिक प्राप्त होऊन राष्ट्रीय पातळीवर लोकमान्यता मिळवून देण्याचा प्रयत्न झाला आहे. सातत्याने विविध उपक्रम, नियमित वार्षिक अधिवेशन आणि अनेक पुरस्कार व पारितोषिकांच्या माध्यमातून परिवारातील घटकाला प्रोत्साहित करणारी मराठी अर्थशास्त्र परिषद एकमेवाद्वितीय ठरते. परिषदेच्या एकूणच जडणघडणीमध्ये परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. नी. वि. सोवनी याबरोबरच डॉ. वि.म. दांडेकर, डॉ. श्री.आ. देशपांडे, डॉ.वि.वि.बोरकर, प्राचार्य या.शि.महाजन, डॉ.आनंद नाडकर्णी, डॉ.स.ह. देशपांडे, डॉ. वि.बा.घुगे, डॉ.ह.कृ.परांजपे, डॉ.रविंद्र सबनीस, डॉ. गो.सी.कल्याणकर, डॉ.नलिनी पंडित, डॉ.रविंद्र दोशी, डॉ.श्रीनिवास खांदेवाले, डॉ.ज.फा. पाटील, डॉ.शशिकांत गंधे, डॉ.व्य.सु.पाटणकर, डॉ.के.जी.पठाण, प्रा.शि.ना.माने, डॉ.म.ग.बापट, डॉ.दि.व्य.जहागिरदार, डॉ. र.पु.कुरुलकर, डॉ.सु.दा.तुपे, डॉ.भालचंद्र मुणगेकर, डॉ.अ.रा.पडोशी, डॉ.संतोष दास्ताने, डॉ. सूर्यकांत जगदाळे, डॉ. मधुकर शिंदे, डॉ. सर्जेराव ठोंबरे, प्रा.दिलीप कदम, डॉ.पी.बी.कुलकर्णी, डॉ.व्ही.बी.भिसे, डॉ. विनायक देशपांडे, डॉ. सौ.मुक्ता जहागिरदार, डॉ.आ.गो.पुजारी, डॉ.कैलास पाटील, प्राचार्य डॉ. जगन्नाथ पाटील, डॉ.श्रीराम जोशी,डॉ. सुहास आव्हाड, डॉ. शिवाजी भोसले, डॉ. रामचंद्र रसाळ, प्रा. चारूदत गोखले, डॉ. रामदास माहोरे, प्राचार्य डॉ.अनिल सूर्यवंशी, प्रा.डॉ.आर.बी. भांडवलकर, प्रा. डॉ. दिलीप अर्जुने, प्रा. डॉ. अनिलकुमार वावरे आणि प्रा. डॉ. विलास खंदारे यांचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे. त्यामुळे त्यांचा नामोल्लेख करणे अत्यंत आवश्यक आहे. याबरोबरच माजी व सद्याचे कार्याध्यक्ष, सर्व माजी कार्यवाह-खजिनदार, अर्थसंवादचे सर्व माजी व सध्याचे संपादक, माजी व सद्याचे विश्वस्त यांचेही योगदान उल्लेखनीय स्वरूपाचे आहे. परिषदेच्या कार्यकारी मंडळाचे सर्व माजी व विद्यमान कार्यरत सदस्यांचेही योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण अशा स्वरूपाचे राहिलेले आहे. आपल्या या परिवारातील सर्व सन्माननीय सदस्यांचे फार मोठे योगदान परिषदेला प्राप्त झाले आहे. या प्रसंगी मी आपले स्वागत करतो आणि २०२४-२५ या वर्षाचा ४७ वा वार्षिक अहवाल आपल्या समोर ठेवतो. कृपया आपण यास मान्यता द्यावी अशी विनंती करतो.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.नी. वि. सोवनी स्मृतीव्याख्यान अधिवेशन काळात आयोजीत केले जाते. ४७ व्या दयानंद महाविद्यालय, लातूर येथील अधिवेशात दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता मराठी अर्थशास्त्र परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.नी. वि.सोवनी स्मृती व्याख्यान या नाविन्यपूर्ण उपक्रमामध्ये चौदावे पुष्प माध्यम क्षेत्राचे अभ्यासक तथा जेष्ठ विचारवंत प्रा.जयदेव डोळे यांनी गुंफले. 'अर्थशास्त्राचे अध्यापन व अध्यापक' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. या विषयावर मांडणी करताना अनेक मान्यवर विचारकांच्या पुस्तकांचा, त्यांच्या आत्मचरित्राचा संदर्भ देत आपल्या विषयाची मांडणी त्यांनी यावेळी केली. प्रथम त्यांनी नी. वि. सोवनी यांच्या स्मृतीना उजाळा दिला. विशेष म्हणजे परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. दि.व्य. जहागीरदार या कार्यक्रमात सहभागी (ऑनलाईन) होऊन डॉ. सोवनी आणि मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या संदर्भात आपले विचार ठेवले. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४७ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ.

अनिलकुमार वावरे यांनी अध्यक्षीय समारोप करताना अध्ययन, अध्यापन आणि संशोधन या तीनही बाबी अर्थशास्त्राच्या शिक्षकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या असून प्रा. जयदेव डोळे यांचे व्याख्यान ही दृष्टी अधिक व्यापक होण्यास साह्यभूत ठरणारी असल्याची भावना यावेळी व्यक्त केली.

परिषदेच्या ४० व्या वार्षिक अधिवेशनापासून परिषदेच्या माजी अध्यक्षांच्या योगदानाबाबत परिचय करून देणारे व्याख्यान दिले जाते. लातूर येथे परिषदेच्या १० व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. रविंद्र सबनीस यांच्या स्मृतीप्रित्यर्थ विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ३० जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ५:०० वाजता प्राचार्य डॉ. उल्हास माळकर यांनी **‘छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती शंभूराजांची अर्थनीती’** याविषयावर आपली अभ्यासपूर्ण विस्तारित मांडणी केली. लातूर येथील अधिवेशनात तीन विषयावर चर्चासत्रे आयोजित करून शोधनिबंध मागवण्यात आले होते. यामध्ये ‘२०१५ पासूनच्या अर्थशास्त्रातील नोबेल स्मृती पारितोषिक प्राप्त अर्थतज्ज्ञाचे आर्थिक विचार.’, ‘भारताच्या वित्तीय क्षेत्राच्या बदलत्या आकृतीबंधाचा अभ्यास' व ‘महाराष्ट्रातील शिक्षण व आरोग्य विषयक धोरणांचा आर्थिक अभ्यास’ हे चर्चासत्रासाठीचे विषय निश्चित करण्यात आले होते. मा. अध्यक्षांच्या वतीने सुचविण्यात आलेला ऐनवेळच्या चौथ्या चर्चासत्राचा विषय ‘माजी पंतप्रधान – डॉ. मनमोहनसिंग’ या विषयावर प्रा. सुभाष दगडे व डॉ. किशोर सुतार यांनी विस्तृत मांडणी करून या विषयावर सभागृहात चर्चा घडवून आणली.

अधिवेशनाच्या काळात देण्यात येणारे विविध पारितोषिक यामध्ये प्रा. डॉ. अरुणा रारावीकर स्मृती (वृत्तपत्रातील लेख) आर्थिक लेख प्रथम पारितोषिक डॉ. दीपक भारती यांच्या **द्विदल अर्थव्यवस्थेतील ‘आनंदाची दिवाळी’** या लेखास तर द्वितीय पारितोषिक डॉ. माधव शिंदे यांच्या **‘डॉलरला वळसा घालणारी वाट’** या लेखाला देण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद उत्कृष्ट ग्रंथ पारितोषिक डॉ. प्रा.डॉ. ज.फा. पाटील यांच्या **‘अर्थवास्तव’** या ग्रंथास देण्यात आले. श्रीमती बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक डॉ. अस्मिता मिलिंद प्रधान यांच्या **‘कोरोना आणि भारतीय अर्थव्यवस्था’** या ग्रंथास देण्यात आले. प्रा. मो. स. भावे पारितोषिक (अर्थसंवाद मधील उत्कृष्ट लेख) डॉ. वनिता केरुजी बनकर यांच्या **‘केंद्र पुरस्कृत विकास योजना आणि भारतीय शेती’** (जुलै-सप्टेंबर २०२३, खंड ४७, अंक २) आणि गणेश आदिनाथ टेकळे यांच्या **‘जागतिक आनंद निर्देशांकाचा सैद्धांतिक अभ्यास आणि भारताची दिशा व दशा'** (जाने-मार्च २०२४, खंड ४७, अंक ४) या लेखाला विभागून देण्यात आले. स्व. प्रा. भास्कर ढाले स्मृती पारितोषिक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथून पदव्युत्तर अर्थशास्त्र विषयात विद्यापीठातून प्रथम येणारा **वैभव प्रितम झरे** यांना देण्यात आले. अधिवेशनात सादरीकरण झालेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधाचे कै.ग.प्र. पिंपरकर पारितोषिक डॉ. गजानन खामकर यांच्या **‘जागतिक दारिद्र्य निर्मुलनासाठीच्या प्रायोगिक संशोधनाच्या विकासाचे आधुनिक प्रवर्तक- डॉ. अभिजित बनर्जी’** व **अमृत मनोहर चव्हाण** यांच्या **‘महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रातील सुधारणा : धोरणात्मक दृष्टीकोनातून’** या विषयावरील शोधनिबंधास विभागून देण्यात आले. प्रा. कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ. अमर्त्य सेन पारितोषिक (चर्चासत्रातील उत्कृष्ट सादरीकरण) **गांजवे प्रशांत तुकाराम** यांच्या **‘क्लाउडिया गोल्डीन यांची यू-आकार वक्र संकल्पना : महिला कामगार सहभाग आणि आर्थिक विकास’** व **निलेशकुमार गुरव** यांच्या **‘भारतीय रिजर्व बँकेची स्वायत्तता आणि कलम ७ एक चिंतन’** या विषयावरील शोधनिबंधास विभागून देण्यात आले. डॉ. ज.फा. पाटील पारितोषिक (अधिवेशन काळात सादर केलेला उत्कृष्ट शोधनिबंध विद्यार्थ्यांकरीता) **रोहिदास शेकू जाधव** यांच्या **‘महाराष्ट्रातील शिक्षण व आरोग्य विषयक धोरणांचा आर्थिक आभ्यास’** व **गौरव गौतम पवार** यांच्या **‘डॉ. अभिजित बनर्जी यांचे दारिद्र्य विषयक संशोधन व समकालीन संदर्भातील योगदान’** या शोधनिबंधास विभागून देण्यात आला. डॉ. ज.फा. पाटील पारितोषिक (रु.२०००/- व सन्मानपत्र) अधिवेशन काळात सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास (विद्यार्थ्यांकरिता) **रोहिदास शेकू जाधव** यांच्या **‘महाराष्ट्रातील शिक्षण व आरोग्य विषयक धोरणांचा आर्थिक आभ्यास’** व **गौरव गौतम पवार** यांच्या **‘डॉ. अभिजित बनर्जी यांचे दारिद्र्य विषयक संशोधन व समकालीन संदर्भातील योगदान’** या शोधनिबंधास विभागून देण्यात आला.

लातूर येथील साधारण सभेत ४८ व्या  वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. विलास भिकाजी खंदारे, छत्रपती संभाजीनगर यांची अविरोध निवड झाली. कार्याध्यक्ष म्हणून डॉ. विकास विनायकराव सुकाळे यांची अविरोध निवड करण्यात आली. विश्वस्त म्हणून डॉ. गणेश बापूराव गावंडे यांची अविरोध निवड झाली, कार्यकारी मंडळ सदस्य म्हणून पुढील सदस्यांची अविरोध निवड करण्यात आली. १. डॉ. विजय नागोराव भोपाळे – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड २. डॉ. धीरज कदम, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. ३. डॉ. दीपक भुसारे  - डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर. उपरोक्त सर्वच कार्यकारी मंडळ सदस्यांची निवड अविरोध करण्यात आली. तर डॉ. संभाजी काळे, डॉ. लक्ष्मण म्हस्के  यांची स्वीकृत सदस्य म्हणून कार्यकारी मंडळाने निवड  केली. स्थानिक कार्यवाह म्हणून डॉ. धनंजय काळे  यांची नियुक्ती करण्यात आली. या सर्व मान्यवरांचे हार्दिक अभिनंदन.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्येष्ठ सदस्यांचे मार्गदर्शन, पदाधिकारी आणि विश्वस्तांचा सल्ला, कार्यकारणी सदस्यांचे सहकार्य, जाहिरातदार व वर्गणीदार यांचे आर्थिक पाठबळ, सत्राध्यक्ष, सूत्रसंचालक, वृत्तलेखक व तज्ज्ञ परीक्षक यांची निरपेक्ष सेवा आणि समस्त आजीव सदस्यांचे सहकार्य यामुळे आपल्या परिषदेचा नावलौकिक वृद्धिंगत होत आहे. आपणा सर्वांना मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४८ व्या वार्षिक अधिवेशनाचे (**दिनांक  ०२,०३ व ०४ नोव्हेंबर २०२५**) आग्रहपूर्वक निमंत्रण..
**धन्यवाद!**

**आपलाच स्नेहांकित**
डॉ. मारोती विरभद्र तेगमपुरे
कार्यवाह-खजिनदार

## ४८ वी वार्षिक साधारण सभा

सूचना

मराठी अर्थशास्त्र परिषदेची ४८ वी वार्षिक साधारण सभा दिनांक ०४ नोव्हेंबर २०२५ मंगळवार रोजी दुपारी १२:३० वाजता श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे पुढील कामकाजासाठी प्रा.डॉ. विलास भिकाजी खंदारे, छत्रपती संभाजीनगर यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. आपण या सभेस उपस्थित राहावे ही नम्र विनंती.

**स्थळ** : अंबड
**दिनांक** : १६ ऑक्टोबर २०२५

**आपलाच स्नेहांकित**
डॉ.मारोती विरभद्र तेगमपुरे
कार्यवाह खजिनदार

१. दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करणे.
२. शनिवार दिनांक ०१ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १२:३० वाजता दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे संपन्न झालेल्या ४७ व्या वार्षिक साधारण सभेच्या इतिवृत्तास मंजूरी देणे. (जोडपत्र क्र. ००) पृष्ठ क्र. ०६
३. कार्यवाह - खजिनदारांनी सादर केलेला सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा अहवाल स्वीकारणे (जोडपत्र ०१) पृष्ठ क्र. ०८
४. अर्थसंवादच्या प्रमुख संपादकांनी सादर केलेला सन २०२४-२५ या आर्थिक वर्षांचा अहवाल स्वीकारणे. (जोडपत्र ०२) पृष्ठ क्र. ०९
५. परिषदेच्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या हिशेबास (ताळेबंद) मंजूरी देणे (जोडपत्र ०३) पृष्ठ क्र. ११
६. परिषदेच्या व अर्थसंवादच्या सन २०२५-२६ या वर्षांच्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे (जोडपत्र ०५अ/आ) पृष्ठ क्र. १३ व १४
७. परिषदेच्या सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी लेखा परीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
८. परिषदेच्या ४९ व्या वार्षिक अधिवेशनाचे स्थान व चर्चासत्राचे विषय निश्चित करणे.
९. विश्वस्त डॉ. घिनमीने विठ्ठल माणिकराव यांची मुदत ३१ मार्च २०२६ रोजी पूर्ण होत आहे. दिनांक ०१ एप्रिल २०२६ ते दिनांक ३१ मार्च २०२९ या तीन वर्षासाठी एका विश्वस्तांची निवड करणे.
१०. परिषदेच्या दि. ०१ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च, २०२७ या एका वर्षासाठी अध्यक्षांची निवड करणे.
११. ०१ एप्रिल २०२६ ते दि. ३१ मार्च २०२९ या तीन वर्षांसाठी कार्यकारी मंडळावर सदस्यांची निवड करणे. मुदत संपणाऱ्या सदस्यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.
    **अ.** डॉ. जयवंत इंगळे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
    **आ.** डॉ. सुभाष सावंत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
    **इ.** डॉ. बाळासाहेब पाटील, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
१२. मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

## महत्वाच्या सूचना

१. गणपूर्ती अभावी वार्षिक साधारण सभा १५ मिनिटे तहकूब करून पुन्हा त्याच ठिकाणी सुरू होईल,अशा वेळी गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

२. कृपया सभेला येतांना वार्षिक अहवाल सोबत आणावा. (परिषदेच्या संकेतस्थळावर अहवाल उपलब्ध आहे.)

३. परिषदेच्या विविध पदाच्या रिक्त जागांसाठी निवडणूकीचे अर्ज कार्यवाह - खजिनदार यांच्या अंबड जि.जालना येथील कार्यालयात मिळतील. प्रत्येक अर्जाची किंमत कार्यकारणी सदस्य पदासाठी १०००/- रुपये आणि अध्यक्ष, विश्वस्त पदांसाठी २०००/- रुपये आहे. इच्छुकांनी मागणी केल्यास संबंधितांना अर्ज पाठविण्यात येईल.

४. उमेदवारी अर्ज कार्यवाह-खजिनदार यांचेकडे **दिनांक ०३ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १२:३० वाजेपर्यंत** अधिवेशन स्थानी स्वीकारले जातील. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

५. दिनांक ०१ नोव्हेंबर २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी ज्या व्यक्ती परिषदेच्या आजीव सभासद झाल्या असतील, अशा सदस्यांनाच निवडणूक प्रक्रियेत भाग घेता येईल. आजीव सभासद क्र. १९७१ पर्यंतचे सदस्यच फक्त निवडणूकीला उभे राहण्यास व मतदान करण्यास पात्र आहेत.

६. मतदान प्रक्रियेत सहभागी होताना आजीव सदस्यांजवळ स्वतःचे छायाचित्र असलेले ओळखपत्र असणे आवश्यक आहे. यामध्ये आधारकार्ड, मतदानकार्ड (शासनाचे), पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, महाविद्यालयाचे प्राचार्यांनी दिलेले छायाचित्र असणारे ओळखपत्र यापैकी कोणतेही एक असणे आवश्यक आहे.

७. वार्षिक वृत्तांत, ताळेबंद, आय-व्यय पत्र या संबंधीचे व साधारण सभेत विचारावयाचे प्रश्न सदस्यांना परिषदेच्या कार्यालयाकडे (कार्यवाह) किमान ०५ दिवस अगोदर लेखी स्वरुपात पाठवावे लागतील.

डॉ. मारोती विरभद्र तेगमपुरे
कार्यवाह - खजिनदार

प्रा. डॉ. विलास भिकाजी खंदारे
अध्यक्ष

## ४७ व्या वार्षिक साधारण सभेचे इतिवृत्त

(जोडपत्र क्र. 00)

मराठी अर्थशास्त्र परिषेरेची ४७ वी वार्षिक साधारण सभा वाजता दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रा.डॉ. अनिलकुमार वावरे यांच्या अध्यक्षतेखाली ०१ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १२:३० वाजता संपन्न झाली.

सभेच्या सुरुवातीला परिषदेच्या दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्याचा प्रस्ताव कार्यवाह-खजिनदार यांनी मांडल्यानंतर सभागृहाने उभे राहून मौन पाळून श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर रितसर कामकाजास सुरुवात झाली. या सभेत पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१) शनिवार दिनांक २७ नोव्हेंबर २०२३ रोजी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड ता. पुरंदर जि. पुणे येथे संपन्न झालेल्या ४६ व्या वार्षिक साधारण सभेच्या इतिहत्तास मंजुरी देण्यात आली.

२) कार्यवाह-खजिनदारांनी सादर केलेल्या सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या अहवालास साधारण सभेने एकमताने मान्यता दिली. यावेळी अहवाल सर्वसाधारण सभेस उपस्थित सदस्यांना छायांकित प्रती देण्यात याव्यात, त्यासाठी किमान ३०० (तीनशे) छायांकित प्रती करण्यात यावे. यास यावेळी मंजुरी देण्यात आली.

३.) अर्थसंवादच्या प्रमुख संपादकांनी सादर केलेला सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचा अहवाल साधारण सभेने एकमताने स्विकारून मान्यता देण्यात आली.

४) परिषदेच्या सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या हिशोबास (ताळेबंद) मंजूरी देण्यात आली.

५) परिषदेच्या व अर्थसंवादच्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आली.

६) परिषदेच्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी लेखा परिक्षकांची नेमणूक व मेहणताना ठरविण्याचा अधिकार कार्यवाह-खजिनदार यांना देण्यात आला.

७) परिषदेच्या ४८ व्या वार्षिक अधिवेशनाचे यजमानपद श्रीमती विमलाबेन खिमाजी तेजोकाया कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, लाम रोड, देवलाली कॅम्प, नाशिक यांना प्रथम तर शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला यांना च्यानंतर अधिवेशन आयोजनाची संधी देण्यात यावी असा ठराव साधारण सभेने एकमताने पारीत केला. तसेच ४८ व्या वार्षिक अधिवेशनात चर्चासत्रासाठी तीन विषय कार्यकारी मंडळाने शिफारस केल्यानुसार चर्चा होऊन सभागृहाने विषयास एकमताने मान्यता दिली.

**१) धोके आणि परताव्याचे आर्थिक सिद्धांतन .**

**२) मनमोहनसिंग यांचे अर्थशास्त्रीय विचार .**

**३) महाराष्ट्रातील व्यसनाधीनतेचे सामाजिक व आर्थिक पैलू .**

उपरोक्त विषयावर सभागृहात चर्चा होऊन एकमताने मंजूर करण्यात आले.

८) परिषदेचे विश्वस्त म्हणून प्रा.डॉ. गणेश बापूराव गावंडे यांची १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२८ या तीन वर्षासाठी अविरोध निवड करण्यात आली.

९) दिनांक १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या एका वर्षासाठी परिषदेचे अध्यक्ष म्हणून प्रा.डॉ. विलास भिकाजी खंदारे, छत्रपती संभाजीनगर यांची अविरोध निवड करण्यात आली.

१०) परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. अविनाश रामलाल निकम यांची ३१ मार्च २०२५ रोजी मुदत संपणार असल्यामुळे दिनांक १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२८ या तीन वर्षासाठी कार्याध्यक्ष म्हणून प्रा.डॉ. विकास विनायकराव सुकाळे यांची अविरोध निवड करण्यात आली.

१०) दिनांक १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२८ या तीन वर्षासाठी कार्यकारी मंडळ सदस्य म्हणून पुढील तिघांची अविरोध निवड करण्यात आली. १. प्रा.डॉ. विजय नागोराव भोपाळे - स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड. २. डॉ. धीरज

कदम – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ , नागपूर. ३. डॉ. दीपक भुसारे – डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

१२) मा. अध्यक्षांच्या परवानगीने पुढील विषयावर चर्चा झाली.

१२.१) लोकनेते मा.खा. रामशेठ ठाकूर यांनी परिषदेस देलेल्या वीस लाख रुपयाच्या देणगीचे स्वागत करण्यात आले. रामशेठ ठाकूर यांनी दिलेल्या प्रस्तावावर चर्चा करून तो स्वीकारण्यात आला. यावेळी त्यांच्या अभिनंदनाचा ठराव साधारण सभेने एकमताने मंजूर केला.

१२.२) नवीन आजीव सभासदांच्या सदस्यत्वास यावेळी मान्यता देण्यात आली.

१२.३) मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या विविध शहरातील खात्यांचे एकत्रीकरण करावे व कार्यवाहांच्या नावाने एकच खाते ठेवावे, असा प्रस्ताव मांडण्यात आला. यावर चर्चा झाली व प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.

सभेच्या शेवटी मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्यवाह-खजिनदार, डॉ. मारोती तेगमपुरे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**डॉ. मारोती विरभद्र तेगमपुरे**
कार्यवाह - खजिनदार

**प्रा. डॉ. अनिलकुमार वावरे**
अध्यक्ष

**मनुष्याणांम् वृत्तिरर्थः**

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**४८ वे वार्षिक अधिवेशन**

**०२,०३ व ०४ नोव्हेंबर २०२५**

**श्री शिवाजी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला**

## अ) मराठी अर्थशास्त्र परिषद लेखापरीक्षण अहवाल : (जोडपत्र क्र ०१)

| खर्च | ३१ मार्च २०२४ रक्कम | ३१ मार्च २०२५ रक्कम | उत्पन्न | ३१ मार्च २०२४ रक्कम | ३१ मार्च २०२५ रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| टपाल खर्च | ३,६८०.०० | २,३५०.०० | बचत खात्यावरील व्याज | ४,८६८.०० | २६,०७९.०० |
| स्टेशनरी, छपाई व अंक संकेतस्थळावर सोडणे. | ८,६३३.०० | ९,९१४.०० | सभासद सुची | १०,१००.०० | १२,१००.०० |
| बँक कमिशन | २१६.२८ | २८७.८८ | गुंतवणूकीवरील व्याज | २,१४,१५९.२८ | २,७०,९११.०० |
| झेरॉक्स | २७४५.०० | २९७९.०० | निवडणूक अर्ज विक्री | २२,०००.०० | ३५,३००.०० |
| प्रवास खर्च | २०१००.०० | ३३८००.०० | इमारत निधी | ९०,०००.०० | ८८,०००.०० |
| मानधन मदतनीस/ लेखणीस | ४०००.०० | ५०००.०० | अधिवेशन प्रतिनिधी शुल्क | २६,९५०.०० | - |
| प्रिंटींग व इतर टायपिंग | ३६४४.०० | ३२००.०० | आजीव सभासद वर्गणी | ३,०९,०००.०० | ३,६३,०००.०० |
| किरकोळ खर्च | १९००.०० | २७००.०० | मुदत ठेव मोड | - | - |
| व्याख्यानमाला व पारितोषिके | ४४५००.०० | ५६३००.०० | इतर जमा | १४,००२.०० | ५,०११.०० |
| ऑडीट फी | १०,०००.०० | १०,०००.०० | डॉ.आर.एस.सोळुंके व्याख्यानमालेसाठी ठेव | ५,००,०००.०० | - |
| अधिवेशन खर्च आणि मानधन | १३,८००.०० | १३,०००.०० | रामसेठ ठाकूर ठेव | - | २०,०००००.०० |
| कार्यालय वीजबील | २०५०.०० | १६९०.०० | | | |
| अर्थसंवाद जुने अंक स्कॅन करणे | १३२०५.०० | ३,०००.०० | | | |
| इनकम टॅक्स भरणा २२-२३ | २६५०.०० | - | | | |
| मुदत ठेव | ८,५०,०००.०० | २३,५०,०००.०० | | | |
| ज्यादा उत्पन्न | २०५०८८.०० | ३०,६,१८०.०० | | | |
| **एकूण रुपये =** | **११,८६,२११.२८** | **२८,००,४०१.००** | **एकूण रुपये =** | **११,८६,२११.२८** | **२८,००,४०१.००** |

**स्थळ :** अंबड

**दिनांक :** १६/१०/२०२५

सही
**डॉ. मारोती तेगमपुरे**
कार्यवाह-खजिनदार

सही
**धनंजय मस्के &असोसीएटस**
सनदी लेखापाल

ब) अर्थसंवाद लेखापरीक्षण अहवाल (जोडपत्र क्र.०२)

| खर्च | ३१ मार्च २०२४ रक्कम | ३१ मार्च २०२५ रक्कम | उत्पन्न | ३१ मार्च २०२४ रक्कम | ३१ मार्च २०२५ रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| अर्थसंवाद छपाई व कागद | १,४२,७९३.०० | १,७७,६३२.०० | अर्थसंवाद वर्गणी व जाहीरात | १,१४,००१.०० | ९४७८०.०० |
| बँक कमिशन | ४८७.१६ | १६१.८८ | म.रा.सा.सं.मंडळ मुंबई | ४४,६३८.०० | ४५,०००.०० |
| सहाय्यक मानधन | २५००.०० | २५००.०० | अर्थसंवाद तुट | ३८४१.१६ | ५७,४६३.८८ |
| स्टेशनरी व इतर | २४०.०० | २९०.०० | | | |
| पोस्टेज | ६२१०.०० | ६२८०.०० | | | |
| प्रिंटींग व इतर टायपिंग | ३४२०.०० | ३५२०.०० | | | |
| झेरॉक्स | १८७०.०० | १८८०.०० | | | |
| प्रवास खर्च | ४९६०.०० | ४९८०.०० | | | |
| **एकूण रुपये =** | **१,६२,४८०.१६** | **१,९७,२४३.८८** | **एकूण रुपये =** | **१,६२,४८०.१६** | **१,९७,२४३.८८** |

**स्थळ :** अंबड

**दिनांक :** १६/१०/२०२५

सही
**डॉ. मारोती तेगमपुरे**
कार्यवाह-खजिनदार

सही
**धनंजय मस्के &असोसीएटस**
सनदी लेखापाल

**मनुष्याणांम् वृत्तिरर्थः**

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**ई) ठेव गुंतवणूक पत्र (जोडपत्र क्र.०४)**

(ठेव गुंतवणूक ३१ मार्च अखेरची)

| अ.क्र. | बँकेचे नाव | प्रमाणपत्र क्रमांक | रक्कम ३१ मार्च २०२४ | रक्कम ३१ मार्च २०२५ |
|---|---|---|---|---|
| १. | बँक ऑफ इंडिया ,पुणे | ३६०३ | २७६७९९.२९ | २७६७९९.२९ |
| २. | बँक ऑफ इंडिया ,पुणे | ९४५२ | ८०४६२२.१८ | ८०४६२२.१८ |
| ३. | बँक ऑफ इंडिया ,पुणे | ५६२७ | १५००००.०० | १५००००.०० |
| ४. | बँक ऑफ इंडिया ,पुणे | ५०३५३७१००००१६१ | ३४७५१३.०० | ३४७५१३.०० |
| ५. | बँक ऑफ इंडिया ,पुणे | ५०३५३७१००००२९३ | ८०००.०० | ८०००.०० |
| ६. | बँक ऑफ इंडिया ,पुणे | ५०३४५११००१३९८८ | १०९६४५.०० | १०९६४५.०० |
| ७. | स्टेट बँक ऑफ ,मुंबई | ३००५४८९५२५६ | ५५,०००.०० | ५५,०००.०० |
| ८. | टाटा इनकम फंड | T-१-००००२८५९३५३८ | २०,१२२.०० | २०,१२२.०० |
| ९. | युटीआय (सीआरटीएस) | १९९२१२१३/०३४४ | १,५०,७००.०० | १,५०,७००.०० |
| १०. | आय.डी.बी.आय. मुंबई | ७१०७००००३४८१२ | ५०,०००.०० | ५०,०००.०० |
| ११. | कॅनरा बँक, अंबड | १४०१३४३१७७६६/१ | ३,०३,०१२.०० | ३,०३,०१२.०० |
| १२. | कॅनरा बँक, अंबड | १४०१३४३१७७६६/२ | ५०,३३९.०० | ५०,३३९.०० |
| १३. | कॅनरा बँक, अंबड | ४०१०००१६८ | १०,७३,८६७.०० | १०,७३,८६७.०० |
| १४. | बँक ऑफ महाराष्ट्रा, अंबड | ६०४८५८९४२३६ | ५,००,०००.०० | ५,००,०००.०० |
| १५. | कॅनरा बँक, अंबड | १३००४८८५४१३६/१ | - | ७,०००००.०० |
| १६. | कॅनरा बँक, अंबड | १३००४८८५५५४९/१ | - | ७,०००००.०० |
| १७. | कॅनरा बँक, अंबड | १३००४८८५५७५५/१ | - | ६,०००००.०० |
| १८. | कॅनरा बँक, अंबड | १४०२२०३५८३७३/१ | - | २,५०,०००.०० |
| १९. | कॅनरा बँक, अंबड | १३००४८८५६०५५/१ | - | १,०००००.०० |
| | **एकूण** | | **५३,२१,६१९.४७** | **७६,६८,२६८.५०** |

**स्थळ :** अंबड

**दिनांक :** १६/१०/२०२५

सही
**डॉ. मारोती तेगमपुरे**
कार्यवाह-खजिनदार

सही
**धनंजय मस्के &असोसीएटस**
सनदी लेखापाल

# मराठी अर्थशास्त्र परिषद -ताळेबंद (जोडपत्र क्र.०३)

| वर्ष | | रक्कम | | रक्कम | |
|---|---|---|---|---|---|
| | | दि. ३१ मार्च २०२४ | | दि.३१ मार्च २०२५ | |
| स्थायी निधी | | | **७८,५१७.०६** | | **७८,५१७.०६** |
| आजीव सदस्य | मागील | **२४५१२७९.००** | | **२७६०२७९.००** | |
| | जमा | ३०९०००.०० | | ३६,३०००.०० | |
| | | **२७६०२७९.००** | **२४५१२७९.००** | | **३१,३२,२७९.००** |
| प्रकाशन निधी | | | ७८,६०७.०७ | | ७८,६०७.०७ |
| अर्थसंवाद स्थायी निधी | | | **३,३४,३५३.००** | | **३,३४,३५३.००** |
| इमारत निधी | मागील | ११६६०६९.०० | | **१२५६०६९.००** | |
| | जमा | ९००००.०० | | ८८,०००.०० | |
| | | | **१२५६०६९.००** | | **१३,४४,०६९.००** |
| **पारितोषिके व पुरस्कार उपक्रम** | | | | | |
| धुळे व्याख्यानमाला निधी | | ७,५००.०० | | ७,५००.०० | |
| स्व. जमनालाल बजाज उपक्रम निधी | | ७५,०००.०० | | ७५,०००.०० | |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा वि. ग्रंथ पारितोषिक निधी | | १०,०००.०० | | १०,०००.०० | |
| मो.स.भावे पारितोषिक निधी | | ५,०००.०० | | ५,०००.०० | |
| कै.ग.प्र.पिंपरकर पारितोषिक निधी | | १३,५००.०० | | १३,५००.०० | |
| डॉ. रविंद्र सबनीस निधी | | ५०,०००.०० | | ५०,०००.०० | |
| डॉ.के.एच.ठक्कर पारितोषिक निधी | | ६,०००.०० | | ६,०००.०० | |
| श्रीमती पद्मजा गंधे पारितोषिक निधी | | २५,०००.०० | | २५,०००.०० | |
| डॉ.ज.फा.पाटील पारितोषिक निधी | | २५,०००.०० | | २५,०००.०० | |
| मातोश्री बयाबाई श्री.कदम पारितोषिक निधी | | २,००,०००.०० | | २,००,०००.०० | |
| सौ.अरुणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कार | | २५,०००.०० | | २५,०००.०० | |
| प्रा. नि.वी.सोवनी स्मृती व्याख्यान निधी | | १,६४,५५०.०० | | १,६४,५५०.०० | |
| डॉ.सुधा मोकाशी पारितोषिक निधी | | १,००,०००.०० | | १,००,०००.०० | |
| स्व.प्रा.भास्कर ढाले पुरस्कार निधी | | ३०,०००.०० | | ३०,०००.०० | |
| डॉ. शंकर मोडक पुरस्कार निधी | | १,००,०००.०० | | १,००,०००.०० | |
| | | | **८,३६,५५०.००** | | **८,३६,५५०.००** |
| अग्रिम सुचीकरीता | मागील | १५५००.०० | | २५,६००.०० | |
| | जमा | १०१००.०० | | १२,१००.०० | |
| | | | **२५६००.००** | | **२७,७००.००** |
| अर्थसंवाद तुट निधी | | | १,५००.०० | | १,५००.०० |
| इतर देणे | मागील | ५८९४२.०० | | -१०,४०२.०० | |
| | जमा | १०४०२.०० | | ९७,९३३.०० | |
| | | ६९३४४.०० | | १,०८,३३५.०० | |
| | अधिक चालू | -५२९७१.०० | | -८२४०२.०० | |
| | | | **१६३७३.००** | | **२५,९३३.००** |
| डॉ.आर.एस.सोळुंके व्याख्यानमाला ठेव | | | **५०००००.००** | | **५०००००.००** |
| राम सेठ ठाकूर ठेव | | | | २०,०००००.०० | २०,०००००.०० |
| उत्पन्न खर्च हिशोब ताळेबंदाप्रमाणे | मागील | २१९२७०४.४८ | | २४,०९,४५१.०० | |
| अधिक चालू वर्षाची वाढ (Capital Receipt 15500) | | १९११४७.०० | | २,०६,९३७.०० | |
| | | २३८३८५१.४८ | | २३८३८५१.४८ | |
| | | - | २३८३८५१.४८ | | २६,१६,३८८.०० |
| | | | **८२७१६९८.१६** | १०९,३९,१९६.०० | **१०९७५८९६.१३** |

**स्थळ** : अंबड
**दिनांक :** १६/१०/२०२५

सही
**डॉ. मारोती तेगमपुरे**
कार्यवाह-खजिनदार

सही
**धनंजय मस्के &असोसीएटस**
सनदी लेखापाल

## मराठी अर्थशास्त्र परिषद

ताळेबंद (जोडपत्र क्र. ०५)

| **जिंदगी** | | **रक्कम** | | **रक्कम** | |
|---|---|---|---|---|---|
| | | दि. ३१ मार्च २०२४ | | दि. ३१ मार्च २०२५ | |
| मुदतठेव व गुंतवणूक | | | **५३५२५८३.००** | **७६,६८,२६८.००** | **७६,६८,२६८.००** |
| **रोख बँकेतील शिल्लक** | | | | | |
| स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई | | ४५३२४.८४ | | ४५३२४.८४ | |
| बँक ऑफ इंडिया पुणे | | ७१७८९६.२४ | | ८,५०,९४६.२४ | |
| बँक ऑफ इंडिया कोहापूर | | १७२६३५.५२ | | १,२८,१४१.६४ | |
| कॅनरा बँक अंबड | | २७५३७.४० | **९६३३९३.१६** | ९०,९००.०० | **११,१५,४०२.२८** |
| | | | | | |
| व्याजावरील TDS | मागील | २१०५०१.०० | | २,३७,५९३.०० | |
| | चालू | २०२२१.०० | | २७,०९२.०० | |
| | एकूण | | | | |
| | परत | | **२१०५०१.००** | | **२६,४६,८५.००** |
| **Building Office** | | | **१७,२५,०००.००** | | **१७,२५,०००.००** |
| **एकूण रुपये** | | | ८२,७१,६९८.१६ | | **१०७,७३,३५५.२८** |

**स्थळ :** अंबड सही सही

**दिनांक :** १६/१०/२०२५ **डॉ. मारोती तेगमपुरे** **धनंजय मस्के & असोसीएटस**

कार्यवाह-खजिनदार सनदी लेखापाल

**मनुष्याणांम् वृत्तिरर्थः**

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**४८ वे वार्षिक अधिवेशन**

**०२,०३ व ०४ नोव्हेंबर २०२५**

**श्री शिवाजी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला**

**मराठी अर्थशास्त्र परिषद अंदाजपत्रक**

**(जोडपत्र क्र.०५/ अ) २०२६-२७**

| खर्च | रक्कम ३१ मार्च | उत्पन्न | रक्कम ३१ मार्च |
|---|---|---|---|
| प्रवास खर्च | २६,०००.०० | साधारण शुल्क | १,२००.०० |
| हिशोब लिहिण्याचा मेहनताना | ६,०००.०० | बचत खात्यावरील व्याज | २६,०००.०० |
| लेखापरीक्षण शुल्क | ११,०००.०० | मुदत ठेवीवरील व्याज | ३,५०,०००.०० |
| बँक कमिशन | १२००.०० | निवडणूक अर्ज विक्री | १५,०००.०० |
| मानधन | ६०००.०० | पा.वा.गाडगीळ व्याख्यान | ५,०००.०० |
| टपाल खर्च | ११,०००.०० | प्रतिनिधी शुल्क | १५,०००.०० |
| अहवाल छपाई व कागद | ११,०००.०० | अर्थसंवाद वर्गणी | ७५,०००.०० |
| स्टेशनरी | ६,०००.०० | जाहिरात | ५०,०००.०० |
| व्याख्यानमाला व पारितोषिक किरकोळ खर्च | ५०,०००.०० | | |
| टायपिंग व झेरॉक्स खर्च | ९,०००.०० | | |
| अर्थसंवाद तूट | ९,४००.०० | | |
| ज्यादा उत्पन्न | ३,९०,६००.०० | | |
| **एकूण रुपये** | **५,३७,२००.००** | **एकूण रुपये** | **५,३७,२००.००** |

**स्थळ :** अंबड
**दिनांक :** १६/१०/२०२५

सही
**डॉ. मारोती तेगमपुरे**
कार्यवाह-खजिनदार

सही
**धनंजय मस्के & असोसीएटस**
सनदी लेखापाल

**मनुष्याणांम् वृत्तिरर्थः**

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**४८ वे वार्षिक अधिवेशन**

**०२,०३ व ०४ नोव्हेंबर २०२५**

**श्री शिवाजी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला**

## मराठी अर्थशास्त्र परिषद अंदाजपत्रक

## (जोडपत्र क्र.०५/ आ) २०२६-२७

| खर्च | रक्कम ३१ मार्च | उत्पन्न | रक्कम ३१ मार्च |
|---|---|---|---|
| अर्थसंवाद छपाई | १,७८,५००.०० | अर्थसंवाद वर्गणी | ७०,०००.०० |
| स्टेशनरी | १,५००.०० | जाहिरात | ५०,०००.०० |
| टपाल खर्च | ६,०००.०० | म.रा.सा.स.मंडळ,मुंबई | ४५,०००.०० |
| मानधन | २५००.०० | बँक व्याज | ६००.०० |
| प्रवास खर्च (पेट्रोल खर्चासहीत) | ५,०००.०० | अर्थसंवाद तूट | ३४,०००.०० |
| बँक कमिशन | ३००.०० | | |
| झेरॉक्स | २,५००.०० | | |
| प्रिटींग व टायपिंग | ३,३००.०० | | |
| **एकूण रुपये** | **१,९९,६००.००** | **एकूण रुपये** | **१,९९,६००.००** |

**स्थळ :** अंबड
**दिनांक :** १६/१०/२०२५

सही
**डॉ. मारोती तेगमपुरे**
कार्यवाह-खजिनदार

सही
**धनंजय मस्के & असोसीएटस**
सनदी लेखापाल

**परिषदेचे विविध उपक्रम**

* स्व. जमनालाल बजाज उपक्रम
* टिळक महाराष्ट्र विद्यापीठ व्याख्यानमाला
* पत्रपंडित पा.वा.गाडगीळ व्याख्यान
* भार्तीयार्जीत नोबेल पुरस्कार स्मृती परिसंवाद
* डॉ. सुधा मोकाशी पुरुस्कृत (व्याख्यान) चर्चा सत्र
* डॉ. नी.वि.सोवनी व्याख्यान (अधिवेशन काळात)
* माजी अध्यक्षांचे योगदानाबाबत व्याख्यान (अधिवेशन काळात)
* धुळे व्याख्यानमाला
* डॉ.आर.एस.सोळुंके व्याख्यानमाला
* कै. मातोश्री भागुबाई चांगू ठाकूर स्मृती व्याख्यान

## मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष

| अधिवेशन | नांव | वर्ष | अधिवेशन | नांव | वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ ले | डॉ. नी.वि.सोवनी | १९७७-७८ | २५ वे | डॉ. अ.रा. पडोशी | २००१-०२ |
| २ रे | डॉ. वि.म.दांडेकर | १९७८-७९ | २६ वे | डॉ. संतोष दास्ताने | २००२-०३ |
| ३ रे | डॉ. श्री.आ.देशपांडे | १९७९-८० | २७ वे | डॉ. सूर्यकांत जगदाळे | २००३-०४ |
| ४ थे | डॉ.वि.वि.बोरकर | १९८०-८१ | २८ वे | डॉ. मधुकर शिंदे | २००४-०५ |
| ५ वे | प्राचार्य या.शि.महाजन | १९८१-८२ | २९ वे | डॉ. सर्जेराव ठोंबरे | २००५-०६ |
| ६ वे | डॉ.आनंद नाडकर्णी | १९८२-८३ | ३० वे | प्रा. दिलीप कदम | २००६-०७ |
| ७ वे | डॉ. स.ह. देशपांडे | १९८३-८४ | ३१ वे | डॉ. पी.बी. कुलकर्णी | २००७-०८ |
| ८ वे | डॉ. वि.बा.घुगे | १९८४-८५ | ३२ वे | डॉ. व्ही.बी. भिसे | २००८-०९ |
| ९ वे | डॉ. ह.कृ.परांजपे | १९८५-८६ | ३३ वे | डॉ. विनायक देशपांडे | २००९-१० |
| १० वे | डॉ. रवींद्र सबनीस | १९८६-८७ | ३४ वे | डॉ. सौ. मुक्ता जहागिरदार | २०१०-११ |
| ११ वे | डॉ. गो.सी.कल्याणकर | १९८७-८८ | ३५ वे | डॉ. आ.गो.पुजारी | २०११-१२ |
| १२ वे | डॉ. नलिनी पंडित | १९८८-८९ | ३६ वे | डॉ. कैलास पाटील | २०१२-१३ |
| १३ वे | डॉ. रविंद्र दोशी | १९८९-९० | ३७ वे | प्राचार्य डॉ.जगन्नाथ पाटील | २०१३-१४ |
| १४ वे | डॉ.श्रीनिवास खांदेवाले | १९९०-९१ | ३८ वे | डॉ. श्रीराम जोशी | २०१४-१५ |
| १५ वे | डॉ. ज.फा. पाटील | १९९१-९२ | ३९ वे | डॉ. सुहास आव्हाड | २०१५-१६ |
| १६ वे | डॉ. शशिकांत गंधे | १९९२-९३ | ४० वे | डॉ. शिवाजी भोसले | २०१६-१७ |
| १७ वे | डॉ. व्य.सु.पाटणकर | १९९३-९४ | ४१ वे | डॉ. रामचंद्र रसाळ | २०१७-१८ |
| १८ वे | डॉ. के.जी. पठाण | १९९४-९५ | ४२ वे | प्रा. चारुदत्त गोखले | २०१८-१९ |
| १९ वे | प्रा. शि.ना. माने | १९९५-९६ | ४३ वे | डॉ. रामदास माहोरे | २०१९-२० |
| २० वे | डॉ. भ.ग. बापट | १९९६-९७ | ४४ वे | प्राचार्य डॉ. अनिल सुर्यवंशी | २०२०-२२ |
| २१ वे | डॉ. दि.व्य. जहागिरदार | १९९७-९८ | ४५ वे | डॉ. आर.बी. भांडवलकर | २०२२-२३ |
| २२ वे | डॉ. र.पु. कुरुलकर | १९९८-९९ | ४६ वे | डॉ. दिलीप सोपानराव अर्जुने | २०२३-२४ |
| २३ वे | डॉ. सु.दा.तुपे | १९९९-०० | ४७ वे | डॉ. अनिलकुमार कृष्णराव वाव्हरे | २०२४-२५ |
| २४ वे | डॉ. भालचंद्र मुणगेकर | २०००-०१ | ४८ वे | डॉ. विलास भिकाजी खंदारे | २०२५-२६ |

**मनुष्याणांम् वृत्तिरर्थः**

## मराठी अर्थशास्त्र परिषदेचे विविध पारितोषिके

★डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उत्कृष्ट ग्रंथ पारितोषिक (₹ १०००/-)

★ प्रा.मो.स.भावे पारितोषिक (अर्थसंवाद मधील उत्कृष्ट लेख) (₹ ५००/-)

★मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक (₹ ११०००/-)

★प्रा. सौ.अरुणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कार (वृत्तपत्रातरील लेख प्रथम ₹ १०००/- व द्वितीय पुरस्कार ₹ ५००/-)

★कै.ग.प्र. पिंपरकर पारितोषिक (अधिवेशनात सादर केलेला सर्वोत्कृष्ट शोधनिबंध) (₹ १०००/-)

★प्रा. कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ. अमर्त्य सेन पारितोषिक (₹ ५००/-)

★ डॉ. शंकर मोडक पुरस्कार (₹ ५०००/-)

★ डॉ. रविंद्र सबनीस पारितोषिक (₹ ४०००/-)

★ डॉ.ज.फा. पाटील पारितोषिक (अधिवेशनात सादर केलेला सर्वोत्कृष्ट शोध निबंध विध्यार्थ्यासाठी) (₹२०००/-)

★ पद्मजा गंधे पारितोषिक (अधिवेशनात सादर केलेला सर्वोत्कृष्ट शोध निबंध महिलांकरीता) (₹१०००/-)

★स्व. प्रा. भास्कर ढाले स्मृती पारितोषिक (संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ) पदव्युत्तर अर्थशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास (₹२०००/-)

★ कै. मातोश्री भागुबाई चांगू ठाकूर (अधिवेशन काळात सादर केलेला सर्वोत्कृष्ट शोध निबंध महिलां आजीव सभासदाकरीता (₹ १५,०००.००)

★ कै. मातोश्री भागुबाई चांगू ठाकूर (अधिवेशन काळात सादर केलेला सर्वोत्कृष्ट शोध निबंध पुरुष आजीव सभासदाकरीता (₹ १५,०००.००)


दयानंद सभागृह


Sponsored By






चर्चासत्र दुसरे
चर्चासत्र तिसरे
सांस्कृतिक कार्यक्रम


उद्घाटन समारंभ
दयानंद शिक्षण संस्था
लातूर संचलित,
दयानंद कला
महाविद्यालय,लातूर




दयानंद शिक्षण संस्था
लातूर संचलित,
दयानंद शिक्षण संस्था
लातूर संचलित,
दयानंद शिक्षण संस्था
लातूर संचलित,




चर्चासत्र चौथे
दयानंद शिक्षण संस्था
लातूर संचलित,
दयानंद कला
महाविद्यालय,लातूर







बुक-पोस्ट

प्रति,

* प्रेषक *

**प्रा.डॉ.मारोती तेगमपुरे**

कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद
संगाई घर नं.२२, शहीद भगतसिंगनगर,
भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड
जि.जालना - ४३१२०४, भ्रमध्वनी : ९४२३९९३१३७